ISSN No-2231-5063

Vol.1,Issue.IX/March 2012;pp.1-4

Research Paper

# महाराष्ट्रातील साक्षरतेचे प्रमाण व महिलांची घटती संख्या

*डॉ.भालचंद्र रूपराव देशमुख*
सहा.प्राध्यापक, जी.एन.आझाद
समाजकार्य महाविद्यालय पुसद
जि.यवतमाळ

## प्रस्तावना :–

सन 2011 च्या जनगणना अहवालानुसार, साक्षरतेच्या बाबतीत महाराष्ट्राने, राष्ट्रीय स्तरावरील साक्षरता दराला मागे सारले. जवळवास प्रत्येक जनगणनेत देशाच्या साक्षरता दराच्या तुलनेत महाराष्ट्र पुढेच राहीलेला आहे.मागील तीन जनगणनेच्या आकडेवरीवर जरी दृष्टि टाकली तरी ही बाब स्पष्ट होते. सन 1991 मध्ये राष्ट्रीय साक्षरता दर 52.21 होता, तर महाराष्ट्राचा 64.87 होता. सन 2001 मध्ये 66 टक्केच्या तुलनेत महाराष्ट्राचा साक्षरता दर 77.27 आणि सन 2011 च्या जनगणनेत साक्षरतेचे प्रमाण 74.04 टक्के च्या तुलनेत 82.91 टक्के होते. यावरून प्रत्येक जनगणनेत साक्षरतेच्या बाबतीत महाराष्ट्र पुढे असल्याचे सिध्द होते. परंतु त्याचवेळी महाराष्ट्रात दर 1000 पुरूशांमागे, महिला व मुलींची संख्या राष्ट्रीय स्तरावरील संख्येपेक्षा कमी होत असल्याचे दिसून येते.

प्रस्तूत शोधनिबंधामध्ये महाराष्ट्रातील जिल्हानिहाय साक्षरता दर व महिला व मुलींचे प्रमाणावर प्रकाश टाकन्यात आला आहे. त्यासाठी दुय्यम स्त्रोताअंतर्गत उपलब्ध आकडेवारीचा उपयोग करण्यात आला आहे.

### *महाराश्ट्रातील साक्षरतेचे प्रमाण*

स्वातत्र्य प्राप्तीनंतर भारतातील शिक्षणाच्या प्रमाणात मोठया प्रमाणावर वाढ झाली. सन 2001 च्या जनगणनेनुसार राष्ट्रीय स्तरावरील साक्षरतेचे प्रमाण 66 टक्के होते. तर पुढील दशकात म्हणजेच 2011 च्या जनगणनेत त्यामध्ये वाढ होवून 74.04 टक्केवर जावून पोहचले. महाराष्ट्राने मात्र प्रत्येक जनगणनेत राष्ट्रीय स्तरावर असलेल्या साक्षरता दराला मागे सारले. याच जनगणनेत म्हणजेच सन 2001 व 2011 च्या जनगणनेनुसार हे प्रमाण अनुक्रमे 76 टक्के व 82.91 टक्के होते. जिल्हानिहाय साक्षरता दरामध्ये महाराष्ट्रात मुंबई उपनगर जिल्हा (90.90टक्के) प्रथम क्रमांकावर असून त्यापाठोपाठ नागपुर जिल्हा (89.52) दुसऱ्या क्रमांकावर होता. मुंबई जिल्हयाचा तिसरा (88.48) तर शिक्षणाचे माहेर घर म्हणून ओळखल्या जानाऱ्या, पुणे जिल्हयाचा (88.23) क्रमांक चवथा होता. साक्षरता दरामध्ये शेवटचे पाच क्रमांक म्हणजेच 31, 32, 33, 34, व 35 व्या क्रमांकावर अनुक्रमे धुळे (74.63, टक्के), जालना (73.61टक्के), बीड (73.53टक्के), गडचिरोली (70.55टक्के), व नंदुरबार (63.04टक्के), जिल्हयाचा क्रमांक लागतो. सारणी 3 नुसार, महाराष्ट्रातील एकूण जिल्हयांचा साक्षरता दर असे दर्शवितो की, जालना, बीड, गडचिरोली, व नंदुरबार ही चार जिल्हे वगळता उर्वरीत 32 जिहयांमध्ये राष्ट्रीय स्तरावरील साक्षरता दरापेक्षा अधिक साक्षरता दर आहे.

### ▪ *महाराष्ट्रातील दर 1000 पुरूषांमागे महिलांचे प्रमाण*

सन 2011 च्या जनगणनेनुसार राष्ट्रीय स्तरावर दर 1000 पुरूषांमागे महिलांचे प्रमाण 940 नोंदविल्या गेले. यातुलनेत महाराष्ट्रात हे प्रमाण कमी म्हणजे 925 नोंदविल्या गेले. मागील जनगणनेच्या (2001) तुलनेत यामध्ये 3 ने वृध्दी झाल्याचे दिसून येते. जिथे हा आकडा सन 2001 च्या जनगणनेत 922 होता. महाराष्ट्राच्या सरासरी संख्येपेक्षा एकूण नऊ जिल्हयांमध्ये महिलांची संख्या कमी असून महाराष्ट्रातील मुंबई जिल्हयात सर्वात कमी म्हणजेच दर 1000 पुरूषांमागे 838 महिलांची नोंद होती. त्यापाठोपाठ मुबई उपनगर या जिल्हयांचा क्रमांक असुन तिथे 857 महिलांची नोंद झाली. यामध्ये अन्य जिल्हयांमध्ये ठाणे (880), पुणे(910), बीड(912), औरंगाबाद(917), उस्मानाबाद(920), जळगांव(922), व लातुर (924) या जिल्हयांचा क्रमांक लागतो.

राष्ट्रीय स्तरावरील महिलांच्या प्रमाणापेक्षा (940) महाराष्ट्रातील एकूण 20 जिल्हयांमध्ये प्रमाण अधिक असून त्यामध्ये सर्वाधिक महिलांची संख्या रत्नागीरी जिल्हयात नोंदविल्या गेली. या जिल्हयात दर 1000 पुरूषांमागे 1123 महिलांची संख्या होती. तर सिंधुदुर्ग जिल्हयात सुध्दा हि संख्या लक्षणिय नोंदविल्या गेली येथे 1037 महिला होत्या. तर गोंदिया (996), सातारा (986), भंडारा (984), गडचिरोली(975) नंदुरबार(972), धुळे (972) ही जिल्हे महिलांची संख्या अधिक असण्यामध्ये पुढे होती.

### ▪ *महारष्ट्रात मुलींचे प्रमाण(0–6वर्ष):*

सन 2011 च्या जनगणनेमध्ये राष्ट्रीय स्तरावर महिलांची संख्या जरी दर 1000 पुरूषांमागे सन 2001 जनगणनेच्या तुलनेत वाढल्याचे दिसून येत असले तरी मात्र मुलींच्या बाबतीत हे चित्र फार निराशवादी आहे. 0 ते 6 वर्ष वयोगटातील मुलींची संख्या केवळ 914 नोंदविल्या गेली. तर महाराष्ट्रात यापेक्षाही गंभीर स्थिती आहे. महाराष्ट्रात ही संख्या फक्त 883 आहे. आणि विशेषतः महाराष्ट्रातील एकूण 35 जिल्हयांपैकी 19 जिल्हयांध्ये राज्यस्तरावर असलेल्या संख्येपेक्षा कमी संख्या आहे, तर राष्ट्रीय स्तरावरील मुलींच्या संख्येशी तुलना करावयाचे झाल्यास राज्यातील एकूण 24 जिल्हयांमध्ये ही संख्या 914 पेक्षाकमी आहे.

मुलींची संख्या कमी असलेल्या जिल्हयांमध्ये बीड जिल्हयामध्ये सर्वात कमी संख्या नोंदविल्या गेली. बिड मध्ये मुलींची संख्या 800.61 नोंदविल्या गेली. यानंतर जळगाव, अमहदनगर, बुलडाना, कोल्हापूर, जालना, औरंगाबाद, उस्मानाबाद, वाशीम, सांगली, या जिल्हयांचा क्रमांक लागतो. या जिल्हयामंध्ये अनुक्रमे 829.01, 838.70., 841.91, 845.22, 846.72, 848.44, 852.54, 859.19, व 861.56 मुलींची संख्या नोंदविल्या गेली जी राज्यास्तरावर असलेल्या मुलींच्या संख्येपक्षाही कमी असल्याचे स्पष्ट करते.

याबरोबरच मुंबई – 874.32, मुंबई उपनगर– 910.07, पुणे– 872.66 या जिल्हयामध्ये सुध्दा राष्ट्रीय आकेडेवारीच्या कमी संख्या नोंदविल्या गेली.

राज्यात सर्वाधिक मुलींची संख्या गडचिरोली जिल्हयात असल्याचे दिसून येते. येथे 956.15 मुली होत्या. त्यापाठोपाठ चंद्रपुर (945.10), गोंदीया (944. 10), रत्नागीरी (938.71), भंडारा (938.04), नंदुरबार (932.16), अमरावती (927.12), नागपूर (925.54), ठाणे (918.17), वर्धा (915.79) या जिल्हयांमध्ये राष्ट्रीय स्तरावरील संख्येपेक्षा अधिक संख्या नोंदविल्या गेली.

### ▪ *साक्षरतेच्या तुलनेत महिला व मुलींचे प्रमाण*

शिक्षणातून व्यक्ती सुसंस्कृत व सामजिक दृष्टया सकारात्मक होतो. असे असतांनाही मात्र सारणी 3 मध्ये स्पष्ट दिसून येते की, महाराष्ट्रातील साक्षरता दर प्रत्येक जनगणेनत वाढत असल्याचे दिसून येते व विशेषतः महाराष्ट्राचा साक्षरता दर हा राष्ट्रीय साक्षरता दरापेक्षा सुध्दा अधिक आहे. असे असतांनाही मात्र महाराष्ट्रात महिला व मुलींच्या बाबतीत नकारात्मक धोरण दिसून येते. महाराष्ट्राला दर 1000 पुरूष तथा मुलांमागे महिला व मुलींची संख्या वाढवीता आलेली नाही, नव्हे राष्ट्रीय स्तरावरील आकडेवारीशी सुध्दा बरोबरी साधता आलेली नाही. महाराष्ट्रात ज्या जिल्हयांमध्ये शिक्षणाचे प्रमाण सर्वाधिक असल्याचे सिध्द होते, त्याच जिल्हयांमध्ये म्हणजेच मुंबई उपनगर, मुंबई, पुणे, ठाणे या जिल्हयांमध्ये महिलांची संख्या इतर जिल्हयांच्या तुलनेत सर्वात कमी असल्याचे दिसून येते. या जिल्हयांमध्ये साक्षरतेच्या तुलनेत महिलांची संख्या अनुक्रमे– 90.90–857, 88.48–838, 87.18–910, 86.18–880 नोंदविल्या गेली. तर ज्या बिड जिल्हयात मुलींची संख्या सर्वात कमी (800.61मुली) असल्याचे दिसून येते, तिथे साक्षरता दर 73.53 टक्के, जळगांव–79.73 टक्के (829.01मुली), अहमदनगर–80.22टक्के (838.70मुली), बुलडाना–82.09 टक्के (841.91मुली), कोल्हापुर–82.90टक्के (845.22मुली) होता. यामध्ये स्पष्ट दिसून येते की सर्वच जिल्हयांमध्ये साक्षरता दर हा जवळपास राष्ट्रीय स्तराऐवढा किंबहुना त्यापेक्षा अधिक असल्याचे दिसून येतो. असे असतांनाही महिला व मुलींची संख्या

**Please cite this Article as :** *डॉ.भालचंद्र रूपराव देशमुख*, *महाराष्ट्रातील साक्षरतेचे प्रमाण व महिलांची घटती संख्या*: **Golden Research Thoughts (March ; 2012)**

 Vol.1,Issue.IX/March 2012;pp.1-4

पुरूषांच्या तुलनेत झपाटयाने कमी होत असल्याचे दिसून येते. तर सारणी 2 मध्ये ज्या जिल्हयांमध्ये अधिक संख्या नोंदविल्या गेली त्यामध्ये काही जिल्हे असे आहेत की जिथे साक्षरता दर हा राष्ट्रीय स्तरावरील साक्षरता दरापेक्षा कमी आहे परंतू तिथे मात्र महिला व मुलींची संख्या अधिक आहे. यामध्ये धुळे नंदुरबार, गडचिरोली या जिल्हयामध्ये साक्षरता दर कमी परंतू महिलांची संख्या  सर्वाधिक आहे. गडचीरोली जिल्हयाचा साक्षरता दर 70.55 टक्के असून या जिल्हयात सर्वात अधिक म्हणजे 956.15 मुली आहेत. तर नंदुरबार जिल्हयाचा साक्षरता दर 63.04 असून या जिल्हयात 932.16 मुली आहेत. राज्यात रत्नागीरी जिल्हयात सर्वाधिक प्रमाणात महिलांची संख्या असून दर 1000 पुरूषांमागे 1123 महिला असल्याची नोंद झाली येथे साक्षरता दर 82.43 ऐवढा आहे.

सारणी 1

2011 च्या जनगणनेनुसार साक्षरतेच्या तुलनेत महिला व मुलींची संख्या

| राज्य तथा राष्ट्रीय स्तरावरील संख्येपेक्षा कमी संख्या असलेली दहा जिल्हे | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अक्र | जिल्हा | साक्षरता दर | मुलींची संख्या | जिल्हा | साक्षरता दर | महिलांची संख्या |
| 1 | बीड | 73.53 | 800.61 | मुंबई | 88.48 | 838 |
| 2 | जळगांव | 79.73 | 829.01 | मुंबई उपनगर | 90.90 | 857 |
| 3 | अहमदनगर | 80.22 | 838.70 | ठाणे | 86.18 | 880 |
| 4 | बुलडाना | 82.09 | 841.91 | पुणे | 87.18 | 910 |
| 5 | कोल्हापूर | 82.90 | 845.22 | बीड | 73.53 | 912 |
| 6 | जालना | 73.61 | 846.72 | औरंगाबाद | 80.40 | 917 |
| 7 | औरंगाबाद | 80.40 | 848.44 | जळगांव | 79.73 | 922 |
| 8 | उस्मानाबाद | 76.33 | 852.54 | लातुर | 79.03 | 924 |
| 9 | वाशीम | 81.70 | 859.19 | वाशीम | 81.70 | 926 |
| 10 | सांगली | 82.62 | 861.56 | बुलडाना | 82.09 | 928 |
| ▪ राष्ट्रीय स्तरावर मुलींची संख्या 913<br>• राज्यस्तरावर मुलींची संख्या 883 | | | | ▪ राष्ट्रीय स्तरावर महिलांची संख्या 940<br>• राज्यस्तरावर मुहिलांची संख्या 925 | | |

सारणी 2

2011 च्या जनगणनेनुसार साक्षरतेच्या तुलनेत महिला व मुलींची संख्या

| राज्य तथा राष्ट्रीय स्तरावरील संख्येपेक्षा जास्त संख्या असलेली दहा जिल्हे | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अक्र | जिल्हा | साक्षरता दर | मुलींची संख्या | जिल्हा | साक्षरता दर | महिलांची संख्या |
| 1 | गडचिरोली | 70.55 | 956.15 | रत्नागीरी | 82.43 | 1123 |
| 2 | चंद्रपुर | 81.35 | 945.10 | सिंधुदुर्ग | 86.54 | 1037 |
| 3 | गोंदीया | 85.41 | 944.10 | गोंदिया | 85.41 | 996 |
| 4 | रत्नागीरी | 82.43 | 938.71 | सातारा | 84.20 | 986 |
| 5 | भंडारा नंदुरबार | 85.14 | 938.04 | भंडारा | 85.14 | 984 |
| 6 | अमरावती | 63.04 | 932.16 | गडचिरोली | 70.55 | 975 |
| 7 | नागपूर | 88.23 | 927.12 | नंदुरबार | 63.04 | 972 |
| 8 | ठाणे | 89.52 | 925.54 | धुळे | 63.04 | 972 |
| 9 | वर्धा | 86.18 | 918.17 | चंद्रपूर | 81.35 | 959 |
| 10 | | 87.22 | 915.79 | रायगड | 83.89 | 955 |
| ▪ राष्ट्रीय स्तरावर मुलींची संख्या 913<br>• राज्यस्तरावर मुलींची संख्या 883 | | | | ▪ राष्ट्रीय स्तरावर महिलांची संख्या 940<br>• राज्यस्तरावर मुहिलांची संख्या 925 | | |

***निष्कर्श***

भारतात महिलांना जरी पुरूषांची अर्धांगीनी मानल्या गेले असले तरी मात्र तिला नेहमीच बंधनात अडकवून ठेवल्या गेले. निरनिराळया माध्यमातून समाजाला महिलांची आवश्यकता नमुद केल्या गेली परंतू असे असतांनाही प्रत्येक जनगणनेतून महिलांची व मुलींची संख्या कमी होत असल्याचे दिसून येते. शिक्षणाने माणूस सुसंस्कृत होत असतो, हे ओळखुन स्वातंत्र्य प्राप्तीनंतर शिक्षणासंदर्भात स्त्रि पुरूष समानेच्या आधारावर शैक्षणिक धोरण राबविल्या गेले. त्या धोरणाचा साक्षरतेत वृध्दी होण्याचा सकारात्मक परिणाम दिसून येत असला तरी मात्र त्याचा नकारात्क परिणाम महिलांची संख्या कमी करण्यावर होत असल्याचे दिसून येते. एकीकडे शंभर टक्के साक्षरतेकडे वाटचाल होत असतांना दुसरीकडे मात्र महिला व मुलींची प्रंचड प्रमाणात घट नोंदविल्या जाने यातून शिक्षणातून सुसंस्कृतपणा हे विधान पुर्णपणे नाकारल्या जात आहे.

**Please cite this Article as :** *डॉ.भालचंद्र रूपराव देशमुख, महाराष्ट्रातील साक्षरतेचे प्रमाण व महिलांची घटती संख्या*: **Golden Research Thoughts (March ; 2012)**

Vol.1,Issue.IX/March 2012;pp.1-4

***संदर्भ***

सेंसस ऑफ इंडिया 2011. प्रोव्हीजनल पॉपुलेशन टोटल्स, लिट्रेटस बाय रेसीडंस
सेंसस 2011डिस्ट्रीकवाईज ड्रिस्ट्रीब्युशन ऑफ पॉपुलेशन इन महाराष्ट्रा
पॉपुलेशन सेंसस 2011. सेंसस 2011.को.इनसारणी 3
महाराष्ट्रातील जिल्हानिहाय साक्षरता दर व महिला व मुलींचे पमाण

सारणी 3

महाराष्ट्रातील जिल्हानिहाय साक्षरता दर व महिला व मुलींचे पमाण

| अक | जिल्हा | साक्षरता दर | जनगणना निहाय महिलांची संख्या (दर 1000पुरूषामागे) | | जनगणना निहाय मुलींची संख्या (दर 1000पुरूषामागे) | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 2011 | 2001 | 2011 | 1991 | 2001 | 2011 |
| 1 | नंदुरबार | 63.04 | 977 | 972 | 977 | 961 | 932 |
| 2 | धुळे | 74.61 | 944 | 941 | 947 | 907 | 876 |
| 3 | जळगांव | 79.73 | 933 | 922 | 925 | 880 | 829 |
| 4 | बुलडाना | 82.09 | 946 | 928 | 945 | 908 | 842 |
| 5 | अकोला | 87.55 | 938 | 942 | 929 | 933 | 900 |
| 6 | वाशीम | 81.70 | 939 | 926 | 941 | 918 | 859 |
| 7 | अमरावती | 88.23 | 938 | 947 | 950 | 941 | 927 |
| 8 | वर्धा | 87.22 | 935 | 946 | 952 | 928 | 916 |
| 9 | नगपूर | 89.52 | 932 | 942 | 951 | 942 | 926 |
| 10 | भंडारा | 85.14 | 981 | 984 | 964 | 956 | 934 |
| 11 | गोदीया | 85.41 | 1005 | 996 | 978 | 958 | 944 |
| 12 | गडचिरोली | 70.55 | 976 | 975 | 980 | 966 | 956 |
| 13 | चंद्रपूर | 81.35 | 948 | 959 | 965 | 939 | 945 |
| 14 | यवतमाळ | 80.70 | 942 | 947 | 961 | 933 | 915 |
| 15 | नांदेड | 76.94 | 942 | 937 | 960 | 929 | 897 |
| 16 | हिंगोली | 76.04 | 953 | 935 | 953 | 927 | 868 |
| 17 | परभणी | 75.22 | 958 | 940 | 956 | 923 | 866 |
| 18 | जालना | 73.61 | 951 | 929 | 951 | 903 | 847 |
| 19 | औरंगाबाद | 80.40 | 925 | 917 | 933 | 890 | 848 |
| 20 | नाशिक | 80.96 | 927 | 931 | 954 | 920 | 882 |
| 21 | ठाणे | 86.18 | 858 | 880 | 952 | 931 | 918 |
| 22 | मुंबई उपनगर | 90.90 | 822 | 857 | 930 | 923 | 910 |
| 23 | मुंबई | 88.48 | 777 | 838 | 942 | 922 | 874 |
| 24 | रायगड | 83.89 | 976 | 955 | 961 | 939 | 924 |
| 25 | पुणे | 87.19 | 919 | 910 | 943 | 902 | 873 |
| 26 | अहमदनगर | 80.22 | 940 | 934 | 949 | 884 | 839 |
| 27 | बिड | 73.53 | 936 | 912 | 939 | 894 | 801 |
| 28 | लातूर | 79.03 | 935 | 924 | 947 | 918 | 872 |
| 29 | उस्मानाबाद | 76.33 | 932 | 920 | 947 | 894 | 853 |
| 30 | सेलापुर | 77.72 | 935 | 932 | 935 | 895 | 872 |
| 31 | सातारा | 84.20 | 995 | 986 | 941 | 878 | 881 |
| 32 | रत्नागीरी | 82.43 | 1136 | 1123 | 961 | 952 | 940 |
| 33 | सिंधुदुर्ग | 86.54 | 1079 | 1037 | 963 | 944 | 910 |
| 34 | कोल्हापूर | 82.90 | 949 | 953 | 931 | 839 | 845 |
| 35 | सांगली | 82.62 | 957 | 964 | 924 | 851 | 862 |
| | महाराष्ट्र | 82.91 | 922 | 925 | | | 883 |

**Please cite this Article as :** *डॉ.भालचंद्र रूपराव देशमुख, महाराष्ट्रातील साक्षरतेचे प्रमाण व महिलांची घटती संख्या*: **Golden Research Thoughts (March ; 2012)**